# Washim District Police

**Nature of Work** :- **Raid on Gambling**

**Police Station** :- **Shirpur**

**Date of Good Work done** :- **09/06/2022**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन शिरपूर हद्दीतील पिंपरी सरहद्द येथील जुगार अड्ड्यावर विशेष पथकाची धाड ; 15 जुगाऱ्यांसह 12 लाखांचा मुद्देमाल ताब्यात.

लोकमत

## जुगार अड्ड्यावर धाड; १२.६२ लाखांचा मुद्देमाल जप्त!

### पिंपरी सरहद येथील कारवाई : १५ आरोपी ताब्यात; विशेष पथकाचा पुढाकार

लोकमत न्यूज नेटवर्क

**शिरपूर** : स्थानिक पोलीस स्टेशनअंतर्गत येत असलेल्या ग्राम पिंपरी सरहद येथे मंगळवारी, ७ जूनला सायंकाळच्या सुमारास अपर पोलीस अधीक्षकांच्या पथकाने जुगार अड्ड्यावर धाडसी कारवाई करत १२ लाख ६२ हजार ८७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी १५ आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे.

पिंपरी सरहद गावापासून जवळच असलेल्या शेतात मोठ्या प्रमाणात जुगार अड्डा चालत असल्याची माहिती अप्पर पोलीस अधीक्षकांच्या पथकास मिळाली होती. त्याआधारे सापळा रचून धाड टाकण्यात आली. त्याठिकाणी भिकाजी जनार्धन कऱ्हाळे, प्रकाश प्रल्हाद गाभणे, नंदकिशोर हिंमतराव टाले, दीपक रूस्तम कऱ्हाळे, शेख अली शेख वलीस, शेख समीर शेख मोहमद, सयद बिलाल सयद लाल, संजय किसन इंगळे, बंडू सुखदेव कऱ्हाळे, दिलीप त्र्यंबक गवळी, विठ्ठल किसनराव कसाब, जुइद खा बिस्मील्ला खा, शेख सलीम शेख सदाजी, शेख कडू शेख वली, आरीफ शाह सत्तार शाह असे एकूण १५ जण जुगार खेळत असल्याचे निदर्शनास आले.

संबंधितांच्या ताब्यातून ८२ हजार २३० रुपये रोख रक्कमेसह ९ दुचाकी वाहने, एक चारचाकी वाहन, १३ मोबाइल, ५२ ताश पत्याचे ६ बॉक्स, असा सुमारे १२ लाख ६२ हजार ८७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी सपोनि भारत लसंते यांच्या फिर्यादीवरून नमूद सर्व आरोपींवर विविध कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक भारसाकळे करत आहेत.



### जुगार अड्ड्यावर सर्व सुविधा

पिंपरी सरहद्द शेतशिवारात शेड उभारून तथा टेबल-खुर्च्या टाकून अन्य सुविधांसह जुगारअड्डा सुरु होता. शिरपूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत सुरु असलेला हा प्रकार हाणून पाडण्यासाठी स्थानिक पोलिसांनी कुठलेच ठोस प्रयत्न केले नाहीत. त्यामुळे अखेर अपर पोलीस अधीक्षकांच्या पथकाला धाड टाकून जुगार अड्डा उद्‌ध्वस्त करावा लागला.

### मानोरा येथे धाड; १७ जण ताब्यात

मानोरा : शहरातील दिग्रस रोडवरील मेडिकलच्या वर छुप्या मार्गाने सुरु असलेल्या वरली-मटका जुगार अड्ड्यावर डीबी पथकाने ८ जून रोजी धाड टाकून १७ जणांना ताब्यात घेतले. २ लाख ७६ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मानोरा शहरात छुप्या मार्गाने सुरु असलेल्या वरली, मटका, जुगाराची माहिती मिळताच धाड टाकून १७ जणांना ताब्यात घेण्यात आले. त्यात कृष्णा शिंदे, विलास वानखडे, विष्णू सुलताने, विनोद पवार, अमोल तायडे, मुरली सवंदळे, शंकर चव्हाण, सुनील गवई, पुरुषोत्तम चिपळे, तुळशीराम शिंदे, अंबादास राठोड, तुळशीराम आडे, ब्राह्मदत्त चव्हाण, योगेश विलायतकर, किशोर डहाके, अरुण पवार, सुदाम पवार अशा एकूण १७ जणांवर कारवाई करण्यात आली. यामुळे अवैध व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहे.